# हिंगोली जिल्हा पोलीस वार्तापत्र

## पोलीस अधीक्षक कार्यालय,हिंगोली.

## दिनांक ०८.०८.२०२२

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०७/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १२ वाहन चालका विरूध्द कार्यवाही करण्यात आली असुन त्यांचे कडुन २,६००/— रूपये दंड वसुल करण्यात आला आहे.

**अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणारे वाहन चालकावर कार्यवाही :—**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयात दि ०७/०८/२०२२ रोजी अवैध वाहतुक करणारे व वाहतुक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकाविरूध्द २८३ मोवाका अन्वये एकुण १६ ठिकाणी कार्यवाही करण्यात आली.

**चोरी :—**दिनांक ०७/०८/२०२२ रोजी फिर्यादी प्रल्हाद सुभाष इंगोले रा कुरूंदा ता वसमत जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे कुरूंदा येथे कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०१.०८.२०२२ रोजीचे सायंकाळी ७.०० वा ते दि.०२.०८.२०२२ सकाळी ५.०० वा दरम्याण फिर्यादीचे शेतातील आखाडयावरील शेड मध्ये मौजे कुरूंदा शेत शिवारात फिर्यादीची जर्सी गाय काळा बांड,शिंग खोपडे,सेपुट गोंढा काळाा वय अंदाजे ०४ वर्ष किअं २०,००० रू ची अज्ञात चोरटयांनी चोरून नेली आहे म्हणुन गुन्हाया संदर्भात कुरूंदा पोलीस तपास करित आहेत.

**सरकारी नौकरावर हल्ला करणाऱ्याविरूध्द गुन्हा नोंद** :— दिनांक ०७/०८/२०२२ रोजी फिर्यादी कुमुद प्रल्हादराव साळवे रा कौठा रोड गोविंद नगर वसमत ता वसमत जि हिंगोली यांचे फिर्यादी वरून पोस्टे वसमत ग्रा.येथे कलम ३५३,३२३,५०६ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन दि.०७.०८.२०२२ रोजीचे सकाळी ९.१५ वा सु मौजे रोडगा येथील मारोती मंदीर परिसराजवळ फिर्यादी हा त्याचे शासकीय कर्तव्य बजावत असतांना आरोपी याने फिर्यादीचे शासकीय कामात अडथळा निर्माण करून थकीत विज बिलाचे वसुलीच्या कारणावरून फिर्यादीस चापट मारून जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा दाखल होवुन या संदर्भात वसमत ग्रा.पोलीस तपास क